# दलितांची आर्थिक परिस्थिती

पूर्वीपासून म्हैशाळ गावात दुधाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालत होता. पुढे सन १९६२ मध्ये म्हैशाळ दूध पुरवठा सहकारी सोसायटी स्थापन झाली. सोसायटी स्थापनेत मधुकरराव देवलांचे सहकार्य लाभले. गावोगाव दुध सोसायट्या स्थापन करुन सहकारी तत्वावर दुध विक्री करावी अशी सरकारची योजना होती. त्यानुसार ही सोसायटी म्हैशाळमध्ये स्थापन्यात आली. दूध सोसायटीचे महत्वाचे उद्दीष्ट म्हणजे गरीबांना व शेतक-यांना दूध व्यवसाय करण्यास मदत करणे. दूध व्यवसायातील अडचणी दूर व्हाव्यात परंतु त्यात ही अडचणी ब-याच होत्या अस्पृश्य कुटूंबाजवळ दूभती जनावरे घेण्यासाठी त्यांना सहाय्य करणे हे प्रथम आवश्यक होते. पण त्याआधी दूध सोसायटी फायद्यात चालणे आवश्यक असते.

देवलांनी म्हैशाळ सहकारी दूध पुरवठा सोसायटी स्थापनेत सहकार्य केले. तसेच सोसायटीचा कारभार वाढवला व अधिक कार्यक्षम केला. दूध सोसायटीला बँकेकडून कर्ज मिळणे शक्य झाले. दूध पुरवठा सहकारी - सोसायटीमार्फत अस्पृश्यांना दूभती जनावरे घेण्यास अर्थ सहाय्य देण्याची योजना कार्यान्वीत झाली. म्हैशाळमधील अस्पृश्य पूर्वी दूध व्यवसाय - करीत नव्हते, त्यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची दरिद्र अवस्थेची होती. अस्पृश्य " रयतेच्या " शेतीवर शेतमजुरी करीत. सोसायटीचा उद्देश - गरीबांना दूध व्यवसाय करण्यास मदत करणे हे महत्वाचे उद्दीष्ट असल्याने सोसायटीच्या सहकार्याने अस्पृश्यांना म्हैस घेण्यासाठी कर्ज देण्याचे ठरविले, परंतु म्हैस कर्ज स्माने घेण्यास अस्पृश्य पुढे येईनात. ही त्यातली पहिली अडचण निर्माण झाली, कारण त्यांना पूर्वी असा अनुभव आला होता की, अशाच कारणामुळे सावकारांकडून जमिनीवर कर्जे काढली होती. त्यामुळे

कांही अस्पृश्यांच्या जमिनी गहाण पडल्या. कांहीच्या कर्ज वाढीमुळे जमिनी विकाव्या लागल्या, इत्यादीमुळे अस्पृश्य कर्ज रुपाने म्हैस घेण्यास स्वत:हून धाडस करेनात दुसरे कारण म्हणजे अस्पृश्यांना कर्ज म्हटले की भिती निर्माण होते कर्ज नाही फिटले तर जमिनी जातील तसेच घरे विकावी लागतील असा समज अस्पृश्यांचा झाला होता. तिसरे महत्वाचे कारण अस्पृश्यांना म्हैसीची देखभाल कशी करावी, धार काढणे त्यांची स्वच्छता राखणे, म्हैशीची गोठा कसा असावा इत्यादी बाबतीत परिपूर्ण माहिती नव्हती. चौथे महत्वाचे कारण म्हणजे म्हैस कर्ज रुपाने घेतली तर म्हैसीच्या दूध व्यवसायापासून मिळालेल्या उत्पन्नावर बँकेचे मिळालेले कर्ज फेडता येते ही कल्पनाच ते करु शकत नव्हते कारण पूर्वीपासून अस्पृश्यांना अशा व्यवसायाची तसेच बँकेच्या कर्जाविषयी माहिती नव्हती. म्हैशाळ येथील अस्पृश्यांजवळ तारण देण्यासाठी जमिनी, सोने नसल्याने त्यांना कर्ज कसे द्यायचे हा प्रश्न उपस्थित झाला. पुढे देवलांच्या सहकार्याने व सोसायटीच्या ठरावानुसार सभासदाला वैयक्तीक जामिन घेऊन म्हैस तारण ठेवून कर्ज - अस्पृश्यांना द्यावे असे ठरले. या ठरावामुळे अस्पृश्यांना कर्ज मिळण्यामागचा अडसर दूर झाला.

म्हैशाळ दूध पुरवठा सहकारी सोसायटीच्या ठरावानुसार १९६२ साला पासून अस्पृश्यांना कर्ज रुपाने म्हैशी तारण ठेवून कर्जे मिळू लागली. अशात-हेने बँका व सोसायटीच्या सहकार्याने म्हैशी वाटप होवू लागल्या प्रथम यल्लाप्पा कांबळे या अस्पृश्याला म्हैस घेण्यास कर्ज मिळाले. अशात-हेने अस्पृश्यांना दूध व्यवसायासाठी कर्जे मिळू लागले. म्हैशाळ येथील परिस्थिती दूध - व्यवसाय करण्यास अनुकूल होती. म्हैशाळ येथील काळी कसदार जमिन तसेच

नदीकाठचा भाग पाणी पुरवठ्याच्या सोयी यामुळे सगळीकडे बागाती हिरवागार परिसरामुळे जनावरांना गवत चारा भरपूर प्रमाणात उपलब्ध होतो. पूर्वीपासून अस्पृश्य सवर्णांच्या शेतीवर मोल मजूरीस जात, त्यावेळी शेतातील भांगलण केलेल्या गवताचा फायदा जनावरे पाळण्यात होऊ लागला. गावचा परिसर सुपिक असल्याने जनावरांसाठी गवत चारा गोळा करण्यास बराच वाव होता. दूध व्यवसाय फायद्याचा आहे व तो चालवणे अवघड नाही असे दिसू लागताच सोसायटीकडे म्हैशीसाठी कर्ज मागण्यास अनेक अस्पृश्य येऊ लागली.

म्हैशाळ सहकारी दूध पुरवठा सोसायटीने सन १९६२ ते १९६८ या सहा वर्षात एकूण नव्वद अस्पृश्यांना म्हैशी घेण्यासाठी कर्ज मिळाले. विशेष म्हणजे सोसायटीला वर्षभर अस्पृश्य सभासदांचे दूध मिळावे तसेच कर्ज फेडण्यास ही सभासदांना मदत व्हावी यासाठी पहिली म्हैस आटण्यापूर्वी दुसरी म्हैस घेवून देण्याची सोय केली. त्यामुळे अस्पृश्यांना दूधपासून वर्षभर सातत्याने पैसे मिळू लागले. सुरुवातीच्या काळात सोसायटीने असा नियम केला की दूध हे पूर्णपणे सोसायटीलाच घातले पाहिजे आणि - सोसायटी दूधाचे पैसे बिलातून कांही कर्जापोटी व कांही सभासदास खर्चा-साठी परत करीत असे त्यामुळे कर्ज वसुली ही आपोआप होत गेली.

म्हैशाळ येथील अस्पृश्यांना दूध व्यवसायापासून थोडी फार संसारात मदत होवू लागली. दूभत्या म्हैशी पासून दर दिवसाला सरासरी सहा लिटर दूध मिळू लागले पूर्वी दूधाचा दर लिटर खालीलप्रमाणे होता.

| साल | म्हैशीच्या दूधाचा लिटरचा भाव रुपये पैसे | गायच्या दूधाचा लिटरचा भाव रुपये पैसे |
|---|---|---|
| १९६३ | ०–६५ | ०–५५ |
| १९६४ | ०–९० | ०–८० |
| १९७८ | २–१० | १–८५ |
| १९८४ | ३–०० | ३–०० |
| १९८८ | ४–०० | ४–०० |
| १९९० | ६–०० | ५–०० |

वरील तक्त्यावरून म्हैशीच्या दूधाचा भाव लिटरला सन १९६३ मध्ये ६५ पैसे १९६४ मध्ये ९० पैसे झाला तर १९७८ साली दूधाचा भाव दोन रुपये दहा पैसे एवढा वाढला पुढे सन १९८४ ते १९९० या सहा वर्षात दूधाचा भाव लिटरला सहा रुपये एवढा झाला. तसेच गायीच्या दूधाचा भाव सन १९६३ ला ५५ पैसे होता पुढे सन १९८८ पर्यन्त लिटरला चार रुपये एवढा झाला. सद्या गायीच्या दूधाचा लिटरचा भाव पाच रुपयापर्यन्त झाला आहे.

वरील दूधाचा भावात सन १९६९ ते सन १९९० पर्यन्त वाढ झालेली आहे. दूधाचा भाव हा बाजारातील वस्तुंच्या महागाईवर तसेच जनावरांच्याचे टंचाईवर अवलंबून असतो. सन १९९० पर्यन्त दूधाचे भाव भरपूर वाढलेला आहे. दूधाचे भाव हे स्थिर नसतात डेअरीचे दूधाचा दर वेगळा व किरकोळ दूधाचा दर वेगळा असतो.

म्हैशाळ येथील अस्पृश्यांची दूध व्यवसाय करण्याची संस्था वाढली.

सन १९६३ ते १९९० पर्यन्त अस्पृश्य कुटूंबाजवळ १४० म्हैशी ९७ संकरित व देशी मिळून गायी होत्या. पुढे सन १९८० ते १९८५ पर्यन्त जनावरांची संख्या कमी झाली. १२० म्हैशी व ७० गायी होत्या. म्हणजे पाच वर्षात व्यवसाय करणा-यांच्या संख्येत घट झाली. याचे कारण शेती सोसायटीच्या शेती प्रकल्पावर काम मिळू लागले तसेच जनावरांची निगा करण्यास टाळाटाळ इत्यादी कारणांमुळे दूध व्यवसायाकडे दुर्लक्ष होऊ लागल्याने जनावरांची संख्या कमी होऊ लागली. तसेच जनावरांना पूर्वी वैरण गवत चारा फुकट मिळत असे पण सध्या चारा विकत घ्यावा लागतो. त्यामुळे ही दूध व्यवसाय करण्यास अस्पृश्य परावृत्ति होवू लागले आहे. दुभत्या जनावराचा चारा विकत घ्यावा लागतो. तो खालीलप्रमाणे दिवसात चारा खाद्य लागते.

| जनावरांचे प्रकार | एकूण वैरणीचा प्रकार | एकूण खर्च किंमत |
|---|---|---|
| म्हैस | ५ पेंडया कडबा, गवत | १० रुपये |
| | ३ पेंडया वाडे | ५ रुपये |
| जर्शी गाई | सुग्रास, गवत मिळून | ४० रुपयापर्यन्त |
| देशी गाय | गवत, वाडे, कडबा | १० रुपयापर्यन्त |

वरील विवेचनावरुन एका म्हैशीस दिवसात १५ रुपयापर्यन्त गवत कडबा, वाडे इत्यादीचे चारा लागतो. संकरित गाईत दिवसात ४० रुपये पर्यन्त खाद्यावर खर्च करावे लागते. देशी गाईस १० रुपयापर्यन्त गवत चारा लागतो. वरील आकडेवारी ढोबळ मानाने काढली आहे. कारण

जनावरांना चारण्यासाठी बाहेर सोडले जाते त्यांना दिवसभर चरवले जाते रात्री फक्त वैरण टाकली जाते. त्यामुळे निश्चित चारा किती लागतो हे काढणे अशक्य आहे. म्हणून अंदाजे खर्च काढावा लागतो.

जनावरांपासून एका दिवसास सरासरी मिळणारे दूध व किंमत

| जनावराचा प्रकार | एकूण एक दिवसाचे दूध | दूधाची एकूण किंमत |
|---|---|---|
| म्हैस | ५-६ लिटर | ३५ रुपये |
| संकरित गाय | २५ लिटर | १०० रुपये |
| देशी गाय | ४ अलिटर | २० रुपये |

वरील आकडेवारी सरासरी एका दिवसाची काढली आहे. एक म्हैस सरासरी दिवसात ३५ रुपयाचे दूध देते, तर संकरित गाय १०० रुपयाचे दूध देते. देशी गाय २० रुपयापर्यन्तचे दूध देते.

एकंदर वरील ढोबळ मानाने म्हैशाळच्या अस्पृश्यांच्या दूधाच्या धंद्याचे खर्चाचे व उत्पन्नाचे प्रमाण काढले आहे. दूध व्यवसायापासून सरासरी प्रत्येकी म्हैशीपासून तीनशे ते चारशे रुपये निव्वळ नफा होतो. तसेच संकरित गाईपासून खर्च वजा जाता निव्वळ सातशे ते आठशे रुपये वार्षिक उत्पन्न - मिळते. देशी गाईपासून चारशे रुपयापर्यन्त निव्वळ उत्पन्न मिळू शकते. वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की अस्पृश्य कुटूंबांना आजपर्यन्त दूध व्यवसाया फायद्याचा ठरलेला आहे. अस्पृश्यांना आजपर्यन्त दूध व्यवसाया-तील मिळणारे उत्पन्न हे फक्त घर खर्चालाच गेले वर्षाकाठी शिल्लक [बचत] राहिलेली नाही. वर्षाअखेरी दूभते जनावरे दूध द्यायचे बंद होते. तेंव्हा

अधिक चणचण भासते त्यामुळे अस्पृश्यांना आर्थिक अडचण जनावरे विकावी लागतात. त्यामुळे अस्पृश्यांच्या जनावरांची संख्या कमी झालेली दिसते. वसंतराव देशपांडे यांनी आपल्या म्हैशाळ दलीत मुक्ती एक प्रयोग या पुस्तकात अस्पृश्यांची दूध व्यवसायाविषयी प्रतिक्रीया व्यक्त केली आहे ते खालीलप्रमाणे

देवाप्पा कांबळे यांच्या मते "सोसायटीने दोन म्हैशी कर्जरुपाने दिल्या एक गाभण देशी म्हैस दुसरी वर्षानंतर मुरा जातीची म्हैस घेतली देशी म्हैस पाच लिटर व मुरा जातीची म्हैस आठ लिटर दूध देई, त्यामुळे - दिवसाकाठी १३ रुपये मिळू लागले. त्यातले निम्मे कर्ज वसुलीवर निम्मे घर खर्चाला मिळू लागले. त्यामुळे आमची उपासमार थांबली व स्वतंत्र धंदा मिळाला."

एक सभासद " दूध व्यवसाय फायद्याचा ठरला त्यामुळे आर्थिक मदत होऊ लागली "

दूध व्यवसाय अस्पृश्यांना सर्वच दृष्टीने उपकारक ठरला तसेच सोसायटीने केलेल्या आर्थिक सहकार्यामुळे अस्पृश्यांना दूध व्यवसायात चालना मिळाली. पूर्वी अस्पृयांना वैरण फुकट मिळत असे त्यामुळे दूध व्यवसाय फायद्यात चालण्याचे हे एक प्रमुख कारण होते. परंतु ही परिस्थिती कायम रहाणे शक्य नव्हते. अनेक लोक या व्यवसायात पडू लागल्याने वैरणीची टंचाई निर्माण झाली, वैरण विकत घेवून जनावरांना घालणे अस्पृश्यांना परवडेना. तेव्हा एकंदर पाहता दूध व्यवसाय हा आर्थिक फायद्याचा आहे. अस्पृश्यांच्या दूध व्यवसायामुळे आर्थिकस्थितीत थोडा फार फरक पडलेला जाणवतो परंतु म्हणावा तसा फरक झालेला नाही. अस्पृश्यांना दूध व्यवसायामुळे घर - खर्चाला पैसे मिळू लागले त्यामुळे उपासमार थांबली व दूध प्रकल्पापासून अस्पृश्यांना

कष्ट करण्याची सवय लागली. त्यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे आर्थिक परिवर्तनास चालना मिळू लागली. म्हैसाळ येथील - अस्पृश्यांच्या घरी जाऊन प्रत्येक प्रत्यक्ष पाहणी करून चर्चा, निरीक्षण - करून वरील दूध व्यवसायाबद्दल वरील आकडेवारी व निष्कर्षक काढले आहेत. तसेच वसंतराव देशपांडे यांच्या पुस्तकाचाही आधार घेतलेला आहे.

दूध सहकारी सोसायटी व सामुदायिक शेती सोसायटीच्या सहकार्यातून घर बांधणीचा उपक्रम हाती घेतला. घर बांधणीच्या योजना [illegible]. गावातील सोसायटीचे सभासद व इतर दलीत कुटूंबे यांच्यासाठी गुरु गोविंद सहकारी मागासवर्गीय भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात आली. तसेच म्हैसाळ स्टेशनजवळ मोकळ्या जागेत स्थायिक झालेल्या भटक्या जमातीच्या कुटूंबासाठी " विजय सहकारी गृहनिर्माण संस्था सोसायटीच्या सहकार्याने स्थापन करण्यात आली.

१] गुरु गोविंद सहकारी मागासवर्गीय भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था

या गृहनिर्माण संस्थेचे कामकाज कांही काळ व्यवस्थतीत चालू नव्हते परंतु अलिकडे संस्थेचे कामकाज चालू झाले, संस्थेत एकूण १९९ सभासद आहेत. गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याचा हेतू दलीतांना त्याच्या जागेत घरे बांधून देणे त्यासाठी सभासदांनी स्वतः:ची जागा संस्थेला विक्री करून दिली. विक्रीचा दर प्रत्येक चौरस मीटरला १०/- रूपये प्रमाणे सभासदांच्या नांवे नोंद करण्यात आली. परंतु खरेदी व्यवहार हिशेबी पुस्तकात नमूद केला नाही. तसेच सभासदांना संस्थेने पैसे दिले नाही. परंतु सभासदांनी संस्थेस सुमारे तीन एकर तीस गुंठे जमिन एकत्र करून दिली.

BARR. ... KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI ... KOLHAPUR

गृहनिर्माण संस्थेने प्रत्येक सभासदास पाचशे बाहत्तर फुट [चौरस] जागा वाटप केलेली असून अहवाल अखेरिस चार घरे पूर्ण केलीत. त्यासाठी ग्रामपंचायत म्हैशाळ या संस्थेकडून सभासदांना विवीध प्रकारची एकूण रूपये १,८०,८०२-८० [ एक लाख ऐंशी हजार आठशे दोन रूपये ऐंशी पैसे] इतकी सबसिडी मिळाली. सभासदांच्या घरबांधणीसाठी कर्ज मिळावे म्हणून महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण वित्तीय सोसायटीकडे मागणी केली. या संस्थेमार्फत एकूण १५२ घरकुले बांधण्याचे ठरविले. त्यापैकी १४० घरे [महार जातीच्या] सभासदांची व १२ घरे [कोरवी जातीच्या] सभासदांची घरकुले आहेत.

एकूण १५२ सभासदांची घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट आहे.

घर बांधीचा आराखडा

| घराची रचना | एकूण घराचा खर्च |
|---|---|
| | रूपये पैसे |
| दोन खोल्या | ४०००-०० |
| एक गोठा | ४०००-०० |
| संडास व गोबर गॅस प्लँट | ३५००-०० |
| रूपये | ११५००-०० |

वरील घर बांधणीचा आराखडा सभासदांच्या गरजा लक्षात घेऊनच तयार केलेला आहे. दोन खोल्या, एक गोठा एक संडास दोन घरांना मिळून एक गोबर गॅस प्लँट अशी घराची रचना आहे.

घर बांधणीसाठी पैशाची व्यवस्था खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| १] सरकारी अनुदान | १००० रुपये |
| २] बिन व्याजी कर्ज | २६०० रुपये |
| ३] सभासदांची वर्गणी | २०० रुपये |
| ४] जिल्हा परिषद अनुदान | २०० रुपये |
| ५] गोबर गॅस प्लॅंट [ खादी कमिशन] | ३५०० रुपये |
| एकूण | ७५०० रुपये |

---

सभासदांच्या घरकुलाचा खर्च प्रत्येकी ११५००/- रुपये एवढा आहे. तसेच घर बांधणीसाठी अनुदान कर्ज इत्यादी मिळून एकत्रीत रक्कम ७५००/- रुपये एवढी आहे. उरलेली रक्कम ४०००/- रुपये ही बँकेकडून कर्ज रुपात काढावे लागणार होते. वरील गृहनिर्माण सोसायटीचे उद्दिष्ट पाहता आजपर्यन्त सोसायटीने फक्त दहाच घरे बांधली आहेत. घर बांधणीस अनेक अडचणी आर्थिक समस्या निर्माण झाल्याने संस्थेची प्रगती झालेली दिसून येत नाही. कारण गृहनिर्माण सोसायटीच्या अहवालावरुन दिसून येते. संस्थेची उद्दिष्टानुसार घरकुले बांधण्यात अडचणी निर्माण झाल्या. आर्थिक समस्येमुळे फंड गोळा नसल्याने संस्थेची सांपत्तीक स्थिती खराब आहे. संस्थेने १९८७ अखेर कर्ज व सबसिडी युनायटेड वेस्टर्न बँक कर्ज रुपये १,०९,९३२-७५ पैसे इतके घेतले तसेच हाऊस फायनान्स शेअर्स रु. ५००/-. विठ्ठल सहकारी शेती सोसायटीकडून रु. २८७४१-१५ पैसे कर्ज रुपात घेतले.

वरील सर्व सबसिडी व कर्ज घेतलेले असता फक्त दहा घरकुले बांधली आहेत यावरुन संस्थेचे प्रगती नाही असे दिसते.

२] श्री विजय सहकारी गृहनिर्माण सोसायटी -

म्हैशाळ रेल्वे स्टेशनजवळ एकूण ६८ कूटूंबे निरनिराळ्या जातीची राहतात, त्यात बेरड, गोसावी, मातंग, चांभार, महार, कोरवी, इत्यादी जातीची वस्ती आहे. त्यापैकी बेरड, गोसावी जातीची दहा वर्षात स्थाईक झालेल्या कुटूंबात झोपडया बांधण्यास जागा नव्हती म्हणून विठ्ठल सहकारी शेती सोसायटीच्या सहकार्याने ही गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात आली. देवलांनी अशा झोपडया असलेल्या परंतु जागा नसलेल्या जातीच्या लोकांना सभासद करुन माहिती सोसायटीमार्फत त्यांना गृहनिर्माण संस्था स्थापनेत सहकार्य केले.

घरांचा आराखडा खालीलप्रमाणे.

| घराची रचना | एकूण घराची किंमत |
| --- | --- |
| १० फुट x १० फुट ची एक खाली बाहेर ओटा | ४०००/- रुपये. |

सरकारी अनुदानाची रक्कम खालीलप्रमाणे.

| | |
| --- | --- |
| अस्पृश्य जमाती | प्रत्येक सभासद १२००/- रुपये. |
| भटक्या जमाती | प्रत्येक सभासदास १७००/- रुपये. |

बँकेमार्फत कर्ज शेकडा नऊ टक्के व्याजाने जिल्हा परिषदांचे अनुदान इ. मुळे घर बांधणीची योजना. आखली.

वरील दोन्ही सहकारी तत्वावरील गृहनिर्माण संस्था विठ्ठल सहकारी संयुक्त शेती सोसायटीच्या सहकार्यामुळे निर्माण झाल्या, विठ्ठल सहकारी शेती सोसायटीच्या सामुदायिक उपक्रमातून स्पष्ट होते. दोन्ही गृहनिर्माण संस्थेतील सभासद हे बहुसंख्य विठ्ठल शेती सोसायटीचे सभासद होते. म्हणजेच विठ्ठल सोसायटीने सभासदांसाठी विवीध इतर उपक्रम राबवून शासनाचे फायदे हे अस्पृश्यांना कोणत्या स्वरुपात मिळायला

हवे ते शासनाकडू अस्पृश्यांना मिळवून देणे म्हणजे याचा अर्थ असा नव्हे की संपूर्ण अर्थ सहाय्य सोसायटी करते परंतु सोसायटी इतर गृहनिर्माण संस्थापन करुन दलीतांना सोसायटीच्या अडचणी तसेच समस्या, शासनाच्या सबसिडीस इत्यादी मिळवून देते.

वरील विवेचनावरुन असे सांगता येईल की गुरुगोविंद गृहनिर्माण सोसायटी व श्री. विजय गृहनिर्माण सहकारी सोसायटी ह्या स्थापन करण्या मागचा हेतू हा दिसतो की विठ्ठल सहकारी सोसायटीचे कार्यक्षेत्र निमित्त वाढावे तसेच दलीत व दलीतेत्तर यांच्यामध्ये सहकार्य निर्माण व्हावे तसेच दलीतांचा सामाजिक स्तर कमी व्हावा आर्थिक उन्नती व्हावी व्हावी यासाठी दोन्ही गृहनिर्माण संस्था स्थापन केले परंतु हा हेतू सफल झाल्याचे दिसत नाही, कारण ज्या उद्देशाने गृहनिर्माण संस्था स्थापन केल्या तो हेतू सफल झाल्याचे दिसत नाही. कारण आजतागायत संस्थाची स्थिती पूर्वीच सारखीच आहे व बहुतेक घरेच फक्त बांधून अर्धवट स्थितीत आहेत. सभासदांमध्ये ही एकवाक्यता दिसत नाही. तसेच संस्थेने खर्चाचे प्रमाण मोठे दाखवले आहे. परंतु त्यामानाने घरकुले निर्माण ही झालेली दिसत नाहीत. यावरुन या दोन्हीही गृहनिर्माण संस्थांचा कारभार अकार्यक्षम झाल्याचे स्पष्ट समजते.

देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीला अतिशय महत्वाचे स्थान आहे. कारण शेती धंदा ग्रामीण भागातील जास्तीत जास्त लोकांना रोजगार पुरवू शकतो शिवाय देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा मोलाचा वाटा आहे. परंतु भारताच्या संदर्भात शेती उद्योग अतिशय मागासलेला उद्योग म्हणून गणला जातो. भारतातील शेती उद्योग ग्रामीण जनतेच्या

प्रश्न सोडविणाच्या दृष्टीने अजुनही समर्थ झाले ला नाही शेतक-यांच्या शेतीच्या तुकडीकरणामुळे शेती आर्थिदृष्टया फायदेशिर नाही, असे शेती तंज्ञाना वाटते या छोटया छोटया शेतीच्या तुकडयावर आधुनिक पध्दतीचे प्रयोग करणे कठीण जाते त्यामुळे या शेतीतून म्हणावे तसे उत्पन्न निघू शकत नाही. त्यामुळे शेतक-यांच्या उपजिविकेला आवश्यक एवढे उत्पन्न सुध्दा या शेतीतून निर्माण होत नाही. म्हणून शेती विकासासाठी व उत्पन्नाच्या वाढीसाठी शेतीचे एकीकरण व्हावे अशा प्रकारचे तज्ञाचे मत आहे.

या शेतीसाठी आवश्यक ती साधने श्रमशक्ती, पाणी, बी-बीयाणे पैसा इत्यादी गोष्टीसुध्दा आवश्यक होवून बसतात म्हणून ग्रामीण - भागातील समस्या सोडवण्यासाठी सहकारी शेती एकत्र शेती आवश्यक आहे असे तंज्ञांचे मत आहे यातून शेतीचे नियोजन लहान शेतक-यांना त्यांच्या शेतीचा खाजगी मालमत्तेचा हक्क न मोडीत काढता त्यांना मदत करता येते. म्हणून सहकारी शेतीचे फायदे लक्षात घेता म्हैशाळ दलीतांना "देवलांच्या" पुढाकाराने सामुदायिक शेतीचा प्रयोग सुरु केला. सामुदायिक शेतीची कल्पना ही प्रथम दूध व्यवसायाला लागणा-या वैरणीच्या शोधातून कोणाचे तरी रान विकत घ्यावे व सर्वासाठी त्याचा वापर करावा असा विचार प्रथम देवल आणि त्यांचे साथीदार यांच्या मनात आला. त्या दृष्टीनी पाहणी करण्यासाठी दलीतांच्या "महारवतन" या जमिनीची पहाणी केली. देवलांना त्यांच्या पाहणीत असे आढळून आले की म्हैशाळ दलीतांची सारी शेती सावकारांच्याकडे गहाण पडलेली होती, पूर्वी देवलांना हे सर्व दलीत भूमिहीन आहेत असे देवलाना वाटले परंतु या सर्व दलीतांना थोडीफार शेती आहे हे समजले.

दलीतांची एकत्र बोलावून मिटींग घेतली जमिन किती आहे ? तसेच जमिनीवर एकूण कर्ज किती आहे ? सावकार कोण आहेत ? याविषयी इत्यंभूत माहिती घेऊन दलीतांच्या जमिनीचे तपासून पाहण्याचे देवलांनी ठरविले त्याकाळी ब्राम्हण जातीचा तलाठी होता. देवलांबद्दल आदर होता. देवलांनी हाती घेतलेल्या कामाविषयी आस्था हे सहकार्याचे कारण असावे देवलांच्या हाती दलीतांच्या जमिनीचे रेकॉर्ड तलाठ्याने दाखवले तेव्हा दलीतांच्या जमिनी कोणत्या सावकारांकडे गहाण पडलेल्या आहेत हे लक्षात आहे. दलीतांच्या जमिनी गहाण घेतलेले एकूण सतरा सावकार निघाले सर्वांचे मिळून दिड लाख रुपये कर्ज देणे होते. एकूण सुमारे सव्वाशे एकर जमिन गहाण पडलेली होती. देवलांनी या सर्व सावकारांची बैठक बोलावली आणि दलीतांना संघटित करून त्यांची आर्थिक उन्नती घडवून आणण्याचा आपला मनोदय देवलांनी सावकरांना सांगीतला. पूर्वी देवलांविषयी गावात आदर होता. त्यांच्या कार्याची सर्वांना कल्पना होती. देवलांविषयी कर्जाची हमी दिल्यावर सावकारांनी देवलांचे म्हणणे मान्य केले. त्याप्रमाणे सावकारांनी देवलांच्यावर विश्वास ठेवून जमिनी सोडल्या. देवलांनी ही सामुदायिक शेती प्रकल्प उभा करण्यासाठी आपल्या मित्र परिवारांकडून आणि स्वत: निधी देवून प्रकल्पासाठी देणगीदार ठेवी स्विकारून मोठ्या प्रमाणावर सामुदायिक सहकारी प्रकल्प उभा केला. तसेच बाहेरून मोठ्या प्रमाणावर मदत मिळू लागली. अनेक लोकांनी आस्थापूर्वक चौकशी करून मदत केली.

यासंदर्भात देवलांना राष्ट्रीय स्वयं सेवक संघातील मित्र परिवारांची फार मदत झाली असे देवलच स्वत: सांगतात देवलांचा प्रकल्पासाठी संघाची मदत झाली तसेच देणगीदारांची पाहणी केल्यास सन १९७१-७२ ची सोसायटीचे

वार्षिक अहवाल तपासले तर देणगीदारांमध्ये बहुतेक संधावर आदर ठेवणा-या व्यक्तीच होत्या. असे दिसते. या प्रश्नात अभिप्रेत आक्षेपात बरेच तथ्य आहे. एकूण सतरा सावकारांपैकी हणमंतराव देवल व चिंतामणी देवल यांच्याकडे पन्नास जणांची सुमारे ७५% टक्के जमिन होती. त्यापैकी दलीतांच्या एकूण जमिनी पैकी ४५ एकर जमिन चिंतामणी देवल यांचेकडे होती ही जमिन दलीतांकडून गहाण घेतल्यावर त्यांनी पंचवीस अश्व शक्तीची इंजिने, पाईपलाईन आणि आणि इतरगोष्टी यांवर खर्च करुन अनेक वर्षे ३०५न्न घेतले ही गुंतवणूक या शेतीवर वाया जाण्याची चिन्हे दिसू लागली. कारण मध्यंतरीच्या काळात डी.आर. ॲक्टमुळे दलीतांच्या गहाण पडलेल्या जमिनी परत मिळणार होत्या मधूकर देवलांचे चिंतामणी देवल हे चुलत भाऊ होते. त्यामुळे चिंतामणी देवलांचे पाऊण लाख रुपये किंमतीची सर्व शेती अवजारे, यंत्रसामग्री इत्यादी गुंतवणूक वाया जाऊ नये म्हणून देवलांनी सफाईदारपणे वकीली करुन तडजोड करुन सर्व शेती यंत्रसामग्री व कर्ज परत घायचे ठरविले आणि दलीतांना ही एकत्रीत करुन संघटित करुन सहकारी सामुदायिक शेतीची योजना आखली अशंत-हेने मधूकर देवलांनी सावकारांचे कर्ज ही परत केले आणि दलीतांच्या जमिनीवर सामुदायिक शेतीचा प्रकल्प उभा केला. देवलांची तडजोड मान्य केली. सावकारांचे पैसे हप्त्यानी देण्याचे ठरले ही परिस्थिती लक्षात घेता सावकारांनी केवळ देवलांची प्रतिष्ठा आणि त्यांच्या कार्याविषयी आस्था यासाठीच जमिनी मुक्त करण्याचे मान्य केले. असे म्हणता येणार नाही हे जरी खरे असले तरी दलीतांच्या जमिनी सोडविण्या याखेरीज दुसरा मार्ग उपलब्ध होता असे वाटत नाही.

सामुदायिक शेती प्रकल्पाची सुरुवात-

दलीतांच्या सर्व जमिनी मुक्त होणार असे दिसू लागताच जमिनी कशी करायची याचा विचार सुरु झाला. एकूण जमिनी पकी निम्यापेक्षा अधिक

सभासदांची जमिनी अर्धा एकराचे पेक्षा कमी होती. आणि जवळ जवळ सर्व सभासदांची जमिन पाच एकरापेक्षा कमी होती एकूण सहासष्ठ शेतकरी सभासदांपैकी पन्नास सभासदांची जमिन अर्धा एकरा पेक्षा कमी होती फक्त पाच सभासदांची जमिन पाच एकरापर्यन्त होती. अशा तुकडे पध्दतीची जमिन स्पष्टक स्वतंत्रपणे कसणे जवळ जवळ अशक्य होते. कारण आकार लहान शेतीची अपूरी साधने शेती कसण्यासाठी लागणारी शेतीची अवजारे वैयक्तीक घेणे परवडण्यासारखे नव्हते व अवजारे घेण्यासाठी वैयक्तीक स्वस्मात पैसा मिळणे अशक्य असल्याने भूमिसिंचनाची व्यवस्था नव्हती. इत्यादी या कारणामुळे तुकडे पध्दतीची जमिन स्वत: कसण्याची कुवत दलीतांमध्ये नव्हती म्हणून देवलांनी दलीतांना सामुदायिक शेती कसण्याची कल्पना मांडली. एकत्रीत शेती केल्याने गुंतवणूक करून जमिनीची उत्पादन क्षमता वाढविणे शक्य होते. तसेच पाणी पुरवठा सामुदायिक शेती करणे सोयीचे होईल, त्यासाठी सहकारी तत्वावर पाणी पुरवठा योजना राबविता येते. त्यामुळे आधुनिक पध्दतीने नगदी पिके घेता येतील असे दलीतामध्ये प्रबोधन केले. संयुक्त पध्दतीनेशेती करण्याचा विचार सर्वांपुढे मांडला तेव्हा त्यावर वाद विवाद न होता सर्वांना एकमताने ही कल्पना मान्य केली.

सामान्यत: संयुक्त सहकारी संस्था प्रस्थापिक करण्याकडे शेतक-यांचा कल नसतो परंतु म्हैशाळ येथीलदलीत शेतकरी यांनी संयुक्त पध्दतीने शेती करण्यास तयार झाले याचे कारण बहूतेकांची जमिन अर्धा एकरापर्यन्त होती. तसेच जमिनीतून उत्पादन अगदीच कमी येत असे तसेच मालकी हक्काची भावना ही कमी झालेली होती. इत्यादी कारणामुळे दलीतांनी जमिनी ताब्यात मिळताच संयुक्त सहकारी शेती सोसायटीस कराराने जमिनीचे एकत्रिकरण केले. त्यामुळे साहजीकच देवलांनी दलीतांची सामुदायिक सोसायटी

स्थापन करण्याचा प्रयत्न केला पुढे सामुदायिक सहकारी शेती सोसायटीला रजिस्ट्रेशन मिळाले आणि सन १९६९ रोजी श्री विठ्ठल सहकारी शेती सोसायटीची स्थापना केली.

कर्जफंड व इतर शेती व्यवस्थापनासाठी सुमारे दोन लाख रुपये फंड देवलांनीच उभा केला त्यात पंचवीस हजार रुपये देणग्यांच्या स्वरुपात राहिलेली रक्कम ठेवी म्हणून मिळाली या फंडामध्ये देवलांचे सत्तर हजार रुपये गुंतवणूक झाली अशा त-हेने सोसायटी चालविण्यासाठी निधी गोळा झाला. परंतु दलीतांना शेती कसण्याचा अनुभव नव्हता अशा परिस्थीतीत दलीतांना शेती संबंधीचे ज्ञान विशेषत: शास्त्रीय पध्दतीच्या शेतीचे तांत्रिक ज्ञान देणे महत्वाचे होते. त्यामुळे देवलांनी शेतीसंबंधी माहिती देण्यासाठी शिबीर अभ्यास मंडळे स्थापन करुन त्याद्वारे दलीतांना प्रत्यक्ष शेती कसण्याचे शिक्षण मिळू लागले देवल स्वत:च्या शेतीवर नेवून दलीतांना आपल्या शेतीतील पिकांची माहिती देवू लागले. विवीध प्रकारची पिकासंबंधी सविस्तर माहिती देवून सभासदांना प्रत्यक्ष शेतीचा प्रयोग दाखवित अशापध्दतीने दलीतांना शेतीसंबंधी शिक्षण मिळाले त्यामुळे दलीता मध्ये शेती कसण्याची माहिती मिळाली दलीत शेतकरी सामुदायिक शेतीमध्ये कष्ट करु लागले विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटीच्या जमिनीवर शेती प्रकल्पास सुरुवात झाली पहिल्यावर्षी तेरा एकर जमिनीत गव्हाचे पिक काढण्याचे ठरले. गव्हाचे पिक घेण्याचा अनुभव सभासदाना नव्हता तरीही देवलांच्या मार्गदर्शनाखाली गव्हाच्या पिकाची सारी कामे करण्यात आली गव्हाचे पिक तयार झाले गव्हाच्या पिकाची मळणी केल्यावर ते मोजण्यात आले तेरा एकरामध्ये एकूण १६९ क्विंटल गहू झाला म्हणजे सरासरी एकरी तेरा क्विंटल गव्हाचे उत्पादन झाले पहिल्या वर्षाच्या उत्पादनामध्ये

असे दाखवून दिले की दलीतामध्ये उत्तम प्रकारे शेती होऊ शकते असा आत्मविश्वास दलीतामध्ये निर्माण होण्यास मदत झाली आणि पुढील उत्पादनासाठी प्रेरणा दलीतांना मिळाली. विठ्ठल संयुक्त सहकारी तोलायटीने सन १९७१ ते १९८६ पर्यन्त घेतलेल्या ऊस, द्राक्षे, ज्वारी या नगदी पिकाची आकडेवारी व टक्केवारी खालीलप्रमाणे.

श्री विठ्ठल संयुक्त सहकारी सोसायटीचे एकरी उत्पादन नगदी पिके ऊस, द्राक्षे, ज्वारी इत्यादी.

| साल | ऊसाचे उत्पादन | | |
|---|---|---|---|
| | एकूण क्षेत्र एकरामध्ये | उत्पादन टनामध्ये | सरासरी एकरी उत्पादन टनामध्ये |
| १९७१ | १६.५० | ५१४.०० | ३१.१५ |
| १९७२ | ३३.२५ | १३३४.८४ | ४०.१५ |
| १९७३ | ३९.०० | १५२७.०० | ४७.१२ |
| १९७४ | २३.०० | ४०९.०० | १७.७८ |
| १९७५ | ३०.८७ | ८६४.०० | २७.९८ |
| १९७६ | २३.६२ | ८५१.३० | ३६.०४ |
| १९७७ | ३६.८० | १०७२.०० | २९.१३ |
| १९७८ | ३१.७५ | ९९२.८० | ३१.२६ |
| १९७९ | नाही | नाही | नाही |
| १९८० | १९.०० | ३५०.०० | १८.४२ |
| १९८१ | ४३.७५ | १६२५.०० | ३७.१४ |
| १९८२ | ५०.५० | १८८४.०० | ३७.३१ |
| १९८३ | २६.७५ | ११५२.०० | ४३.०७ |
| १९८४ | २८.०० | १०५५.०० | ३७.६८ |
| १९८५ | १९.५० | ६५२.०० | ३३.४४ |
| १९८६ | १७.५० | ४६०.०० | २६.२९ |

श्री विठ्ठल संयुक्त सहकारी सोसायटीचे एकरी उत्पादन नगदी पिकं ऊस द्राक्ष ज्वारी इत्यादी.

| साल | द्राक्षे उत्पादन | | |
|---|---|---|---|
| | एकूण क्षेत्र एकरामध्ये | उत्पादन एकरात किलोमध्ये | सरासरी एकरी उत्पादन किलोमध्ये |
| १९७१ | १.५० | २०००.०० | १३३३.३३ |
| १९७२ | १.१० | १०६८.०० | ९७०.९० |
| १९७३ | १.१० | २४४०.०० | २२१८.१८ |
| १९७४ | १.१० | ३२००.०० | २९०९.०९ |
| १९७५ | १.०० | ३७२५.०० | ३७२५.०० |
| १९७६ | १.०० | ३१०६.०० | ३१०६.०० |
| १९७७ | १.०१ | ३३०८.०० | ३००७.२७ |
| १९७८ | १.०१ | ५२३८.०० | ४७६१.८१ |
| १९७९ | नाही | नाही | नाही |
| १९८० | १.१० | ४०००.०० | ३६३६.३७ |
| १९८१ | ६.०० | ४००००.०० | ६६६६.६६ |
| १९८२ | ६.०० | ४४६००.०० | ७४३३.३३ |
| १९८३ | ७.०० | ५२०५४.०० | ७४३२.०० |
| १९८४ | ७.०० | ४४३२८.०० | ६३३२.५७ |
| १९८५ | ७.०० | ४००००.०० | ५७१४.२९ |
| १९८६ | ७.०० | ३२२६४.०० | ४६०९.१४ |

श्री विठ्ठल संयुक्त सहकारी सोसायटीचे एकरी उत्पादन नगदी पिके उत्त द्राक्षे ज्वारी इत्यादी.

| साल | ज्वारीचे उत्पादन | | |
|---|---|---|---|
| | एकूण क्षेत्र एकरामध्ये | उत्पादन किलोमध्ये | सरासरी एकरी उत्पादन कि. मध्ये |
| १९७१ | ३.०० | ४००.०० | १३३.३३ |
| १९७२ | ११.०० | ९७००.०० | ८८१.८१ |
| १९७३ | – | – | – |
| १९७४ | ४०.०० | १०७००.०० | २६७.५० |
| १९७५ | २२.७७ | १७५९४.०० | २६७.५० |
| १९७६ | २०.०० | १६६२७.०० | ७७२.६९ |
| १९७७ | २३.०० | ४३००.०० | ८३१.३५ |
| १९७८ | २५.०० | ८७००.०० | १८६.९५ |
| १९७९ | नाही | नाही | नाही |
| १९८० | ९.०० | – | ३३३.३३ |
| १९८१ | २५.०० | ३०००.०० | ३२८.०० |
| १९८२ | २७.०० | ८२००.०० | ३४०.७४ |
| १९८३ | २१.५० | ९२००.०० | ४१३.९५ |
| १९८४ | १४.५० | ८९००.०० | ४००.०० |
| १९८५ | – | ६६००.०० | – |
| १९८६ | ३५.०० | ७०००.०० | २००.०० |

१९७१ ते १९७९ सोसायटीचा अभ्यास स. ह. देशपांडे यांच्या अहवाल स. ह. देशपांडे व १९७४, ७७, ७८ विठ्ठल सोसायटीचा अहवाल माहिती तसेच

~~9576~~

9575 ~~9578~~
A A

ऊस द्राक्षे, ज्वारी या पिकांची आकडेवारी ही डॉ. राजेंद्र पाटील यांनी महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह क्वार्टली पूणे या एप्रिल १९८८ मध्ये को-ऑपरेटिव्ह फारमिंग सोसायटी अन्ड प्रॉडक्टीव्हीटी ... म्हैशाळ - इक्सपिरीमेंट पेज २२७ आहे. या वरील आकडेवारीनुसार म्हैशाळ सोसायटीने सन १९७१ ते १९८६ पर्यन्त घेतलेल्या पिकांची टक्केवारी समजून येते. सोसायटीने पंधरा वर्षाच्यापर्यन्त ऊसाच्या पिकाखाली १७ ते ५१ एकरापर्यन्त जमिनीची गुंतवणूक केली. त्या कालखंडात ऊसाचे एकरी उत्पादन १८ टनावरुन ४७ टनापर्यन्त वाढलेली आहे. १९८६ ते १९८९ पर्यन्त ऊसाचे पिक घट झालेली आहे. द्राक्षेचे पिक सोसायटीने प्रथम सन १९७९ ते १९८० च्या साली एक एकर द्राक्ष बाग लावली सन १९८० ते १९८६ या सहा वर्षात द्राक्ष पिकाखाली सोसायटीची एकूण सात एकर जमीनीवर द्राक्षे घेतली आहेत. एकरी उत्पादन २३५० किलो मिळविले आहे. सरासरी १८०००/- रुपये एकरी द्राक्षापासून निव्वळ नफा झाला आहे. असे एकंदर उत्पादनावरुन दिसते. १९८६, १९८९ नवीन तीन एकर बाग लावण्यात आली. ज्वारीसाठी सन १९७१ ते १९८६ पर्यन्त २५ एकरापर्यन्त जमिन गुंतवलेली दिसते. दर एकरी सात क्विंटल ज्वारीचा उतारा झाला. १९८६-८९ मध्ये ज्वारीचे पिक उत्पन्नात घट झालेली दिसते.

वरील आकडेवारी ही ठोबळ मानाने ऊस, द्राक्षे, ज्वारी या पिकांची आहे कारण प्रत्येक वर्षी कमी जास्त प्रमाणात पिकांचे उत्पादन झाले आहे. प्रत्येक पिकांचे उत्पादन काढणे कठिण आहे कारण प्रत्येक वर्षी पिक सारख्या प्रमाणांत येत नाही पिकावर रोग पडतात वादळी पाऊस धुके इत्यादी नैसर्गिक आपत्ती येतात तसेच पिकांची वेळच्या वेळी निगा न

झाल्यास पिकांचे प्रमाण कमी येते म्हणून वरील आकडे सरासरीने ढोबळ मानाने काढलेली आहे. वरील पिकांचे एकरी उत्पादन तसेच सोसायटीने आजपर्यन्त घेतलेली नगदी पिके याची माहिती होण्यास मदत होईल.

वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की सोसायटीकडे जमिन ही नगदी पिकाखाली जास्त गुंतवलेली आहे कारण नगदी पिकामुळे भरपूर पैसा व उत्पादन मिळते परंतु हे उत्पादन वैयक्तीक शेतक-यांपेक्षा कमी आहे. कारण वैयक्तीक शेतकरी ऊस पासून एकरी आठ ते दहा हजाराचे उत्पन्न काढतो तर द्राक्षापासून एकरी वीस ते पंचवीस हजारापर्यन्त काढतो. परंतु सोसायटीने आजपर्यन्त घेतलेल्या जमिनीतून उसाचे व द्राक्षाचे पिक एकरी उत्पादन इतरांच्यापेक्षा कमीच काढले आहे हे वरील आकडेवारीवरून कळून येते. एकंदर पाहता १९७१ ते १९७३ पर्यन्त सोसायटीला नफा झालेला आहे हे खालील आकडेवारीवरून दिसले.

श्री विठ्ठल संयुक्त शेती सोसायटीला शेती उत्पन्नातून झालेला निव्वळ नफा तोटा पत्रक खालीलप्रमाणे.

| साल | निव्वळ नफा रु. पैसे | तोटा रु. पैसे |
|---|---|---|
| १९६९–७० | ९३५–०० | – |
| १९७०–७१ | ४१७८–०० | – |
| १९७१–७२ | १११५१–९८ | – |
| १९७२–७३ | ९१३०–४९ | – |
| १९७३–७४ | ५८८३–०० | – |

| | | |
|---|---|---|
| १९७४-७५ | ४७६४-०० | - |
| १०७५-७६ | ४८७०-०० | - |
| १९७७-७८ | ९९८६-०० | - |
| १९७८-७९ | १०११६-६५ | - |
| १९७९-८० | १२६९०-३१ | - |
| १९८०-८१ | - | - |
| १९८१-८२ | १५६८९-६४ | - |
| १९८२-८३ | १९५४२-४० | - |
| १९८३-८४ | - | २५४८७-७८ |
| १९८४-८५ | - | अहवालात नमूद नाही |
| १९८५-८६ | - | ९२७-८७ |
| १९८६-८७ | - | ५५१०४-४५ |
| १९८७-८८ | - | ४६१७८६-१३ |
| १९८८-८९ | - | ८७२५१-०१ |

नियोजनाच्या बाबतीत विठ्ठल सहकारी शेती संस्थेच्या बाबतीत कांही प्रश्न इथे उभे होतात.

वरील तक्त्यावरून आपणास एक गोष्ट लक्षात येते की म्हणजे संस्थेच्या प्रारंभीच्या वर्षात संस्थेला निव्वळ नफा ४ हजार रुपये एवढा झाला. सन १९७१-७२ या सालात जवळपास ७ हजारांनी रु. वाढला परंतु १९७२-७३ पासून ते १९७५-७६ पर्यन्त रु. ९१३० पासून उतरुन ४८७० रुपये पर्यन्त घसरला पुढे १९७६ ते १९७२ पर्यन्त संस्थेचा नफा १५५४२ रुपयांनी वाढला १९८२ हे वर्ष सोडल्यास संस्थेला नफा म्हणावा तसा वाटलेला नाही.

सन १९८३-८४ सालापासून तर आजपर्यन्त शेती संस्थेला सारखा तोटा सहन करीत आहे. यासंबंधी एक गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे ती म्हणजे सन १९८३ साली या संस्थेची जवळ जवळ ४ एकराची द्राक्षबाग वादळामुळे कोसळली व संस्थेला परिणामी जवळजवळ तीन लाख रूपयांचे वर तोटा सहन करावा लागला या संबंधी सोसायटीच्या व्यवस्थानातील लोकाना विचारले असता वादळामुळे कोसळली. अशाप्रकारची उत्तरे देण्यात आले. परंतु या वादळामुळे म्हैशाळमधील इतर बागायतदारांच्या द्राक्ष बागा का कोसळल्या नाही ? दलीतांची बाग का कोसळे ? निसर्गाने या - बाबतीत अस्पृश्यता पाळली नाही ना ? अशा प्रकारचे महत्वाचे प्रश्न येथे उपस्थितीत होतात. म्हणजे बाग उभारण्यात लागणारे साधनसामुग्री चांगल्या क्वालीटीची वापरली गेली नसावी असा तर्क केला जाऊ शकतो. या बाबतीत सभासदांकडून अपेक्षित माहिती मिळणे शक्य नव्हते. कदाचित योग्य देखभाल झाली नसावी असे वाटते. बागेची, तारेची बांधणी योग्य झाली नसावी असे वाटते. ~~समस्येच्या~~ इत्यादी समस्या डोळ्यापुढे उभ्या राहतात सहकाराचे अनेक उद्देश आहेत एक म्हणजे लोकांच्या सहमती संस्थेच्या - व्यवस्थापनामध्ये सर्व सभासदांचा सहभाग वाढविणे विठ्ठल संयुक्त सहकारी शेती संस्थेच्या व्यवस्थापनात सर्व सामान्य दलीत सभासदांचा कितपत सहभाग होता ?

आमच्या अभ्यासात व निरीक्षणात असे आढळून आले की सर्व साधारण सभेतून बहुतेक दलीत सभासद भाग घेत असतात परंतु त्या सभेत आपले मतभेद व्यक्त करीत नाहीत इतर खाजगीत ते लोक संस्थेच्या विषयी मतभेद व्यक्त करताना दिसते. आमच्या पाहणीत आणखी एक गोष्ट आढळून आली ती म्हणजे आतापर्यन्त संस्थेच्या कार्यकारिणीच्या संदर्भात उच्च पदे दलीत

सभासदातील ५ एकराच्यावर शेती असलेल्या सभासदाचीच वरणी लागलेली आहे. त्यामुळे विठ्ठल सहकारी संस्थेचे पुरेसे प्रमाणात लोकशाहीकरण झालेले नाही.

सहकारी संस्थेचे दुसरे महत्वाचे वैशिष्ठ असे की संस्थेतून निर्माण झालेल्या नफ-याचे समान वाटप विठ्ठल शेती संस्थेने निर्माण केलेल्या नफ-याचे समान वाटप केले आहे काय ?

जमिनीचा खंड - दर एकरी

| प्रत | १९७४ पूर्वी रु. दर एकरी | १९७४-७५ रु. एकरी | १९७५-७६ रु. एकरी | १९७७-७८ र. एकरी | एकूण जमिन एकर |
|---|---|---|---|---|---|
| अ | ३०० | ४०० | ५०० | ५०० | ४८ |
| ब | १०० | ३०० | ३०० | ४०० | १८ |
| क | ५० | २०० | २०० | ३०० | ३९ |
| ड | | | | २०० | २२ |
| | | | | | १२७ एकर |

सभासदाना त्यांच्या जमिनीचा खंड वरील तक्त्याच्या आधारे सन १९७४ ते १९७७-७८ पर्यन्त जमिनीच्या तीन प्रती ठरल्या त्याप्रमाणे जमिनीच्या खंडाची प्रत [अ] १९७४ साली २०० रुपये एकरी खंड मिळत होता पुढे १९७७-७८ साली ५०० मिळू लागला.

प्रत [ब] १९७४- १०० रुपये एकरी खंड मिळत होता पुढे १९७८-७९ साली ४०० रुपये खंड मिळू लागला.

प्रत क] १९७४ साली ५० रुपये मिळत पुढे १९७७-७८ साली ३०० रुपये मिळू लागला.

पुढे १९७८-८९ पर्यन्त खंडाचे प्रमाण वाढलेले नाही. या वरील तक्त्या-रून खंडाचे प्रमाण समान नाही असे दिसते जमिनीच्या खंडाचे प्रमाण असमान आहे. जमिनीचा खंड रु. ५०० मिळवणारे जास्तीत जास्त सभासद संस्थेत आहेत तर ५००० हजारापेक्षा जास्त खंड मिळवणारे ही सभासद सुध्दा संस्थेत आहेत. अशा परिस्थितीत हे असमान खंडाचे वाटप होण्याचे कारण म्हणजे संस्थेच्या दृष्टीत सभासदामध्ये जमिनीचे असमान मालकी आहे. उदा. अर्ध्या एकराहून कमी शेती असलेले जवळजवळ पन्नास टक्यापेक्षा जास्त सभासद आहेत. या विठ्ठल संयुक्त सहकारी संस्थेत ५ ते १० एकरांची मालकी असलेले सभासद ही आहेत. त्यांच्यात खंडाच्या बाबतीत असमान वाटप झालेले दिसते.